## अवघड रूग्ण यशस्वी चिकित्सा ः रूग्णाच्या शब्दांत

**'लिव्हर सिरॉसिस ःकाळ आला होता पण...' ः श्रीमती इनामदार, राजेन्द्रनगर, पुणे. फोन ः 020 24321424**

आयुर्वेदातील एक आश्चर्य मला सांगावेसे वाटते. २-३ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. अवघड अशी चारीधाम यात्रा करून आले होते. घोडा डोलीच्या सहाय्याने खूप उंच हिमालयाजवळ जाता आल्याचे समाधान होते. आल्यावर ७-८ दिवसांनी पायावर थोडी सूज आली. दगदगीने असेल म्हणून घरगुती उपाय केले. मग बी.पी.ने पाय सुजतात म्हणून जवळच्या डॉ.ना दाखवले. इ.सी.जी. वगैरे सोपस्कार झाले. तोवर सूज पोटापर्यन्त गेली व चालणे अवघड झाले. नणंदेने अजून एका डॉ.ना दाखवयला लावले. त्यांनी ताबडतोब पायाची सोनोग्राफी करायला सांगितली. पोटाचीही केली. मग रात्रीच कमला नेहरूपार्कजवळच्या मोठ्या हॉस्पिटलात ॲडमिट केले. उपचार सुरू झाले. मग बालगंधर्वजवळील प्रख्यात यकृत्‌तज्ज्ञ डॉ.नी रिपोर्टस्‌ पाहून एंडोस्कोपी करवली. १० दिवसात यकृताचा आकार पूर्ववत्‌ व्हायला हवा होता. ॲलोपॅथीत आता याला औषधे नाहीत. हॉस्पीटलात राहणे उपयोगाचे नव्हते. लगेच घरी आलो. मधल्या काळात माझ्या सुनेने आमच्या घराशेजारच्या 'एका वैद्यांना' विचारून ठेवले होते. त्यांचे 'आयुर्वेदीय' उपचार सुरू केले. ॲलोपॅथी पूर्ण बंद केली.

'वैद्य' म्हणाले "आजार ३ महिन्यात आटोक्यात आणीन पण पेशंट आणि घरातील सर्वांचे सहकार्य हवे". 'वैद्यांची' औषधे व सांगितलेप्रमाने सुनेने दिलेले पथ्याचे अन्न सुरू झाले.

माझ्या मते देवावर जशी श्रद्धा ठेवतो तशी 'वैद्य' व आयुर्वेदीय औषधे यावर ठेवली पाहिजे म्हणजे गुण लवकर येतो. औषधसेवन हसतमुखाने व नियमितपणे करायला हवे.

१५ दिवसानंतर परत रक्ततपासणी केली तर आश्चर्यकारक सुधारणा झाली होती. ते रिपोर्ट यकृत्‌तज्ज्ञ डॉ.ना दाखवले. ते म्हणाले "कोणते वैद्य ? 'अमुक' का ?" त्यांनी पुण्यातील ज्येष्ठ प्रख्यात वैद्यांचे नाव घेतले. त्यावर आमच्या 'वैद्यांचे' आम्ही नाव सांगितले. डॉ. म्हणाले "आश्चर्यकारक सुधारणा आहे. तुमच्या 'वैद्यांना' हे एक आव्हान आहे". धन्वंतरिंचा आशीर्वाद लाभलेल्या व श्रीरामावर श्रद्धा असलेल्या या वैद्यांमुळे आमची सर्वांची श्रद्धा आयुर्वेदावर आहे.

उपचारांच्या काळात सुरूवातीला २ सप्ताह पाण्याऐवजी दूधच प्यायचे होते. आयुष्यभर रोज नियमितपणे दोन्ही जेवणात खात असलेले दही ताक वर्ज्य. औषधे कडू होती पण त्यांचा गुण मात्र गोड आला. त्यामुळे **'काळ' आला होता पण *'वैद्यांच्या आयुर्वेदीय औषधांनी'* 'वेळ' येऊ दिली नाही.** घरातील माझी सून व मुलगा यांच्या जपणुकीमुळे मी गेली ३ वर्षे तब्येत व्यवस्थित ठेवलीये. सर्वांची प्रगति व नातवंडांचे अभ्यास-कलागुण मी डोळ्यांनी पाहते. या सुंदर जीवनातील संगीताचा आस्वाद मी अनुभवत आहे. समाधानी आहे.

पुनः एकदा 'वैद्यांना' धन्यवाद. आयुर्वेदाची प्रगति अशीच वृद्धिंगत होवो व जनसामान्यांना त्याचा लाभ मिळो.

## अवघड रूग्ण यशस्वी चिकित्सा ः वैद्यांच्या शब्दांत

**विरेचन पित्ताचे, रक्षण यकृताचे, आनंदधाम जीवनाचे !!!!!**

'रूग्णानुभव' कथन करणाऱ्या या सदराचा उद्देश असा आहे की 'अशाही प्रकारचे आजार आयुर्वेदीय उपचारांनी निश्चित बरे होतात' हा विश्वास समाजात रूजावा. 'आता याला जगात उपचार नाही' असा निराशावाद सोडावा. 'आयुर्वेदात अमुक आजारावर औषध आहे का' असा 'संशय' बाळगण्यापेक्षा 'आयुर्वेद' हे 'शास्त्र' आहे त्यामुळे कोणत्याही आजाराचे स्वतःच्या परिभाषेत आकलन करून त्यावरील उपाय सुसंगतपणे मांडणे हे निश्चित शक्य हा आहे विश्वास धरावा. समाजातील सर्व स्तरांपर्यन्त 'एक संदेश' पोहोचवण्यासाठी आम्ही या मासिकाचे व्यासपीठ स्वीकारले आहे. तो संदेश ः

एखाद्या शास्त्राने विशिष्ट रोगाचे नाव (लेबल) दिले की लगेच हातपाय गाळण्यापेक्षा आणि सर्व उपाय संपल्यावर अगदी शेवटी 'इलेव्हन्थ अवरला' चान्स म्हणून आयुर्वेदाकडे येण्यापेक्षा जर यथाशीघ्र आयुर्वेदाचा आश्रय घेऊन आयुर्वेदाला थोडी लवकर संधि दिली तर 'गुण लवकर' येईलच शिवाय संतोषजनक आशादायी फळ मिळणे शक्य होईल आणि अनावश्यक असे अनेक प्रकारचे शारीरिक मानसिक आर्थिक नुकसान टाळता येणे शक्य होईल.

**विकारनामाकुशलो न जिहीयात्‌ कदाचन न हि सर्वविकाराणाम्‌ नामतोऽस्ति ध्रुवा स्थितिः**

विकार (रोग) चे नाव ज्ञात नसले तरी चालेल. त्याबद्दल लाज बाळगण्याचे काहीच कारण नाही.

कारण सर्वच रोगांचे निश्चित नामकरण करता येतेच अशी स्थिति नसते.

**स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः स्थानान्तराणि च प्राप्य विकारान्‌ कुरूते बहून्‌**

तोच एक विकृत शरीरघटक विभिन्न कारणांनुसार शरीराच्या विभिन्न अवयवांत वेगवेगळे रोग करतो.

**तस्माद्‌ विकारप्रकृतीः अधिष्ठानान्तराणि च बुद्ध्वा हेतुविशेषांश्च शीघ्रं कुर्यात्‌ उपक्रमम्‌**

म्हणून १. विकार निर्माण करणारा मूळ विकृत्‌ शरीरघटक २. विकारग्रस्त अवयव ३. विकाराची आहार, विहार, व्यवसाय इ. बाह्यकारणे यांचा सर्वांगीण विचार करून 'त्वरित्‌' उपचार करावेत.

© www.mhetreayurved.com, 9422016871

"तुमच्याकडे अमुक रोगावर औषध आहे का हो?" असा प्रश्न अनेकदा आयुर्वेदीय चिकित्सकास विचारला जातो. पण हा प्रश्न प्रस्थापित आधुनिक वैद्यकास कुणी विचारत नाही. रोग कोणता का असेना, प्रस्थापित आधुनिक वैद्यकात उपाय असेलच, असा एक सार्वत्रिक भाबडा समज समाजात आहे. पण ज्याअर्थी प्रस्थापित आधुनिक वैद्यकापूर्वी आयुर्वेद हेच आरोग्यशास्त्र होते त्याअर्थी रोगाचे नाव काही का असेना, त्यावर उपचार करण्याची शास्त्रीय पद्धती आयुर्वेदशास्त्रात अस्तित्वात असणारच ना? एकदा ० ते ९ हे अंक आणि बेरीज, वजाबाकी, भागाकार, गुणाकार या मूलभूत प्रक्रिया शिकल्या की गणित पुस्तकातले असो अगर नसो , व्यवहारातला हिशोब अचूकपणे करता येतोच ना? त्याचप्रमाणे रोग कोणता का असेना, त्याचे 'दोष दूष्य' या शास्त्रीय परिभाषेत आकलन करून रोगनिवारण कसे करावे, याचे मूलभूत दिग्दर्शन आयुर्वेदीय सिद्धांत करतातच. म्हणूनच प्रस्थापित आधुनिक वैद्यकाचे रोगनिदान काहीही असले तरी त्याचे आयुर्वेदीय आकलन करून उपचार शक्य असतात. फारतर उपचारांपूर्वी व नंतर आवश्यक ते रिपोर्ट्स करून समाधान करता येते. पण प्रत्येकवेळी तुमचे उपचार आमच्याच परिभाषेत सिद्ध करा म्हणणे हे आडमुठेपणाचे व हेकेखोरपणाचे लक्षण होय. 'क्रिकेटचा खेळ फुटबॉलचा चेंडू वापरून खेळा' हे म्हणणे हास्यास्पद नव्हे का? त्याने अंततः रूग्णाचेच नुकसान होते. किमान समाजसेवेशी व मानवी जीवनाच्या अस्तित्वाशी संबंधित शास्त्रांनी व त्याच्या अनुयायांनी आकस व अभिनिवेश सोडून परस्परांच्या मर्यादा व शक्तिस्थाने जाणून घेऊन विधायक दृष्टि बाळगणे रूग्णाच्या व समाजाच्या हिताचे ठरेल. अशी विधायक दृष्टि ठेवूनच प्रस्तुत रूग्णानुभवातील आयुर्वेदीय चिकित्सेचे शास्त्रीयत्व मांडण्याचा प्रयत्न......

यामध्ये निदाननिश्चितिसाठी वय, व्यवसाय, अवस्था, आहार, कुलवृत्त, पूर्ववृत्त, उपलब्ध रिपोर्ट्स यांचा कसा सर्वांगीण विचार करता येतो आणि रोगाची कारणे शोधल्यानंतर आयुर्वेदीय शास्त्रीय परिभाषेत म्हणजे 'दोषदूष्य' या शब्दांत त्याचे आकलन करून चिकित्सेची दिशा 'शोधन' व 'शमन' या पद्धतींनी कशी ठरविता येते हे मांडण्याचा प्रयत्न......

'प्रस्तुत रूग्ण : स्त्री वय : ५६ वर्षे. पूर्ववृत्त : प्रवाहिका आव पडणे

आहार : फार पूर्वीपासून रोज दही ताक दोन्ही जेवणात.

ऋतु : वर्षा (पित्तचय व अग्निमांद्य) व शरद् (पित्तप्रकोप = वाढ, रक्तविकृति = बिघाड)

परीक्षण : पाद : शोथ (सूज) , उदर : जलसंचय , यकृत् : अत्यंत उष्ण स्पर्श

रिपोर्ट्स् : Liver Scan : Liver Shrinkage Spleen Enlarged. **Cirrhosis**

Sonography : Ascites, Gall Stones. Murphy's Sign : Negative

National Instt of Virology : **Hepatitis C Positive**

Occult Blood Positive. SGOT 45 (Normal 5-35). SGPT 49

Albumin 2.4 (Normal 3.5-5.5) Globulin 3.6 (Normal 1.5-3.0)

A/G Ratio 2 : 3 (Normal 2 : 1 )

'निदान' : दोष : पित्त गुण : उष्ण, द्रव दूष्य : रक्त, मांस अग्नि : मंद

स्रोतस् : रक्तवह, स्रोतोमूल : यकृत् व प्लीहा

आहार (दही ताक) व ऋतु (वर्षा, शरद) यांनी , द्रव व उष्ण गुणांनी

**पित्तवृद्धि, रक्तदुष्टि, अग्नि मंद यातून 'यकृत्' (रक्तवह स्रोतोमूल व पित्तस्थान) व प्लीहा यांची हानी व**

द्रवाधिक्याने शाखागत शोथ व कोष्ठगत उदर

चिकित्सा : १. निदान परिवर्जन (कारणे थांबवणे) : द्रव व उष्ण बंद.

२. शोधन : पित्त निःसरणार्थ 'विरेचन' (पहा पृष्ठ ११)

३. पित्त शमनार्थ : तिक्त, शीत, अनुलोमक औषधे

४. पथ्य : सुरूवातीला पाण्याऐवजी फक्त दूध. हिरव्या मुगाचे कढण.

'नंतर फळभाज्या, भाकरी, उकळून गार केलेले पाणी, डाळिंब, मोरावळा, अंजीर

रूग्ण स्वतः व कुटुम्बीय यांनी श्रद्धाविश्वासाने उपचार घेतले व संयमाने मनापासून पथ्य पाळले याचा उपचारांच्या यशात मोलाचा वाटा आहे. रूग्ण बरा होण्यासाठी आणि बरा राहाण्यासाठी त्याच्या स्वतःच्या व कुटुम्बीयांच्या सहकार्याची खूप गरज असते. तरच ज्याला जगात उपाय नाही असे हेपॅटायटिस सी विषाणू किंवा लिव्हर सिरॉसिस अशासारखे दुर्धर रोग कायमचे व मुळापासून बरे करणे शक्य होते. अर्थात् विरेचन (शोधन = पंचकर्म) व तिक्त, शीत, अनुलोमक औषधे व आहारनियंत्रण या 'शास्त्रीय' उपचारप्रक्रियेचा मूलाधार या यशाला आहेच.

कुणाही बाबाने तंबूत बसून पानं मुळ्या देणं म्हणजे आयुर्वेद नव्हे, तर 'का आणि कसं' या प्रश्नांचं आयुर्वेदाच्या शास्त्रीय तत्त्वानुसार सुसंगत स्पष्टीकरण देता येणं हा आयुर्वेद. केमिस्टसुद्धा किरकोळ तकारींवर गोळ्या देतो, त्यानं बरंही 'वाटतं' मग त्याला डॉ. म्हणता का? तसंच कुणीही झाडपाला देतो म्हणजे आयुर्वेद नव्हे. नुसतं हर्बल म्हणजे तर नक्कीच 'शास्त्रीय आयुर्वेद' नव्हे.

'यस्य कस्य तरोः मूलं येन केनापि मिश्रितम् यस्मै तस्मै प्रदातव्यं यद्वा तद्वा भविष्यति' हा आयुर्वेद नाही, तर 'इदम् एव औषधम् अस्मै अनेनैव विमिश्रितम् कालेऽस्मिन्नेव दत्तं चेत् 'एवम् एव' भविष्यति' हे सांगणं म्हणजे आयुर्वेद शास्त्र.

© www.mhetreayurved.com, 9422016871